ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 8 | APRIL - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत कोरडवाहू शेतीची भूमिका

प्रा.कांबळे ए.पी.
सहाय्यक प्राध्यापक, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय,सोलापूर.

प्रस्तावना :-

शेती व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे असे म्हणतात. कारण भारताच्या अर्थ व्यवस्थेत शेती व्यवसायाची भूमीका महत्वपुर्ण राहीली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या रोजच्या गरजा पुर्ण करण्यासाठी आवश्यक असणारे अन्नधान्य, कडधान्य,फळे, भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ इत्यादीचा पुरवठा शेती क्षेत्रातून होत असतो. शेती क्षेत्र हे केवळ अन्नधान्याचा पुरवठा करते असे नाही, तर उद्योगाना लागणारा कच्चामाल पुरविण्याची जबाबदारी या क्षेत्रावर आहे. स्वातंत्र्या पासून ते आजतागायत भारताच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राची कामगिरी महत्वपुर्ण राहीली आहे.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्र हे राज्य देशामध्ये औद्योगिक क्षेत्रात एक प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राच्या एकूण भौगोलिक परिस्थितीचा विचार करता पश्चिम महाराष्ट्राचा ज्याप्रमाणात विकास झाला आहे. त्याप्रमाणात मराठवाडा,कोकण, विदर्भ या प्रदेशाचा विकास झाला नाही. शेती विकासाच्या बाबतीत पश्चिम महाराष्ट्र हे अग्रेसर आहे. तर मराठवाडा विदर्भ कोकण हे प्रदेश मागासलेले आहेत. एकूण ओलीताखालील जमिनी पैकी पश्चिम महाराष्ट्रामध्ये ओलीताखालील जमिनीचे प्रमाणे जास्त आहे. तर इतर प्रदेशात ते कमी आहे. म्हणूनच मराठावाडा,विदर्भ या प्रदेशामध्ये शेतकऱ्याच्या आत्महत्येचे प्रमाणे जास्त आहे. त्याचे कारण म्हणजे या प्रदेशामध्ये बागाती शेती पेक्षा कोरडवाहू शेतीचे प्रमाण जास्त आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे:-

१) महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतीची स्थिती समजावून घेणे.
२) कोरडवाहू शेतीच्या समस्या जाणून घेणे
३) कोरडवाहू शेतीच्या समस्या सोडविण्यासाठीच्या उपायाची चर्चा करणे.

कोरडवाहू शेती :-

ज्या ठिकाणी वार्षिक पर्जन्यमान ७५० मी. मी.पेक्षा कमी आहे अशा ठिकाणी जी शेती केली जाते त्यास कोरडवाहू शेतीचा प्रदेश म्हणतात. अशा शेती मध्ये कायमस्वरुपी सिचंनाच्या पाण्याच्या सुविधेचा अभाव असतो. अशा प्रदेशामध्ये अनिश्चित प्रमाणात पाऊस पडतो. दुष्काळाची परिस्थिती असते. शेती उत्पादनात अनिश्चितता असते. या प्रदेशात गरीबी,बेकारी मोठया प्रमाणात असते. अशा स्वरुपाच्या शेतीला कोरडवाहू शेती म्हणण्याचे कारण म्हणजे शेतीचे उत्पादन ५०० मी.मी. पेक्षा कमी पडणाऱ्या पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. महाराष्ट्राची शेती मुख्यत: मोसमी पावसावर अवलंबून आहे. एकूण लागवडीच्या क्षेत्रापैकी फक्त १५ ते १६ टक्के क्षेत्रच ओलीताखाली आहे. तर जवळ जवळ ८४ ते ८५% क्षेत्र मोसमी पावसावर अवलंबून आहे. अशा क्षेत्रात केली जाणारी शेती म्हणजे कोरडवाहू शेती होय. महाराष्ट्रा मध्ये जी कोरडवाहू शेती केली जाते त्यामध्ये बाजरी,ज्वारी, दाळी, सोयाबीन,कापूस,तेलबीया इत्यादी पिके घेतली जातात. या बरोबरच बोर,सिताफळ,दाळींब,पेरु,संत्री मोसंबी इत्यादी कमी पावसावर येणाऱ्या फळबागा सुध्दा केल्या जातात. कोरडवाहू शेती दोन्ही हंगामामध्ये केली जाते. १) खरीप हंगाम- या हंगामामध्ये बाजरी,ज्वारी ,मका ,तुर, कापूस , सोयाबीन,मुग,उडिद व गळीत धान्य इत्यादी पिकाचे उत्पादन घेतले जाते. २) रब्बी हंगाम- या हंगामामध्ये ज्वारी, करडई,हरभरा,सुर्यफुल इत्यादी पिके घेतली जातात. महाराष्ट्रा मध्ये जी कोरडवाहू शेती केली जाते त्या शेतीचे धारणक्षेत्राचे प्रमाण कमी आहे. कोरडवाहू शेती करणाऱ्यामध्ये लहान शेतकरी आणि सिमांत शेतकऱ्याची संख्या जास्त आहे.

कोरडवाहू शेतीची वैशिष्टये:-

१) कोरडवाहू शेती ही प्रामुख्याने कमी पावसावर केली जाते. विशेषत: ज्या भागात अनिश्चित आणि असमान पाऊस असतो अशा भागामध्ये या शेतीचे प्रमाण अधिक आहे. पाऊस अनिश्चित असल्याने कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ अशी स्थिती या प्रदेशामध्ये दिसते. म्हणजेच सारख्या पर्जन्यमानाचा अभाव हे या शेतीचे वैशिष्टये होय.

२) कोरडवाहू शेतीमध्ये वापरात येणारी जमिन सर्वत्र सुपिक असत नाही. बऱ्याचवेळा कमी सुपिक जमिन किंवा कनिष्ठ जमिनीचा वापर मोठया प्रमाणात केला जातो. या शेतीसाठी ही जमिन असमतोल व चढउताराची असते.

३) जमिनीच्या पर्याप्त वापराचा अभाव हे आणखीन एक वैशिष्टय या शे्तीचे सांगता येईल. उत्पादकतेची शाश्वती नसल्याने सर्वच जमिन लागवडीखाली आणली जात नाही.

४) विशिष्ठ प्रदेशात एकाच पिकाचे प्रमाण अधिक असते.उदा.विदर्भात कापूस,मराठवाडयात सोयाबीन,तूर, उडीद, कोकणात भात शेती, सोलापूर जिल्हयात ज्वारीची शेती,

५) या शेतीचे आणखीन एक वैशिष्ट म्हणजे ही शेती पारंपारिक पध्दतीने केली जाते. अशा शेती मध्ये फारसे नविन प्रयोग बघायला मिळत नाहीत.

६) कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्याकडे धारण क्षेत्र कमी असल्याने व उत्पादनाचे प्रमाणे कमी असल्याने शेतकरी सातत्याने गरीबीत, जीवन जगत असलेला दिसून येतो.

७) कोरडवाहू शेतीला सहाय्यक व्यवसाय म्हणून कुकुटपालन,पशुपालन,दुग्ध व्यवसाय इत्यादी व्यवसाय शेतकऱ्याकडून केले जातात.

८) कोरडवाहू शेतीमध्ये शेतकऱ्याची प्रतिक्षा क्षमता कमी असते त्यामुळे शेतकरी सतत कर्ज बाजारी असतो.

कोरडवाहू शेतीची भूमीका:-

महाराष्ट्रात जवळ जवळ ८५% क्षेत्रावर कोरडवाहू शेती केली जाते. शेतीच्या बाबतीत महाराष्ट्राची समाधानकाकर स्थिती नाही. महाराष्ट्राच्या एकूण शेती व्यवसायात कोरडवाहू शेतीची भूमीका महत्वपुर्ण राहिली आहे. कोरडवाहू शेतीतून मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो. त्यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील काही प्रमाणात बेकारीचा प्रश्न सोडवीण्यास मदत झाली आहे. अलिकडच्या काळामध्ये कोरडवाहू शेतीत फळबागाची लागवड वाढत चालली आहे. उदा.आवळा, सिताफळ,बोर इत्यादी यातून ग्रामीण लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. बागाची संख्या वाढू लागल्यामुळे खतविक्री केंद्रे ,किटकनाशके, रासायनिक द्रव्ये इत्यादी विकणाऱ्याची संख्या सुध्दा मोठया प्रमाणात वाढल्याने याही क्षेत्रात रोजगाराच्या संधी निर्माण झालेल्या आहेत. रोजगार वाढल्याने या भागातील गरीबीची तिव्रता कमी करण्यास मदत झाली आहे.

कोरडवाहू शेती मुळे शेतमाल प्रक्रीया संस्थाची संख्या दिवसे दिवस वाढत चालली आहे. उदा. कोकणामध्ये काजूप्रक्रिया उद्योग, मराठवाडा, विदर्भ या भागात ज्वारी पासून मद्य बनवीण्याचे कारखाने सुरु केले जातात. या बरोबरच संत्री, मोसंबी,लिंबू इत्यादीवर प्रक्रीया करुन ज्युस बनविणारे प्रकल्प स्थापन केले जातात. अशा प्रकारे कोरडवाहू शेती आपली भूमीका पारपाडत आहे. कोरडवाहू शेतीत कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणात घेतले जाते कापड गिरण्या सूत गिरण्या यांना लागणारा कच्चा माल म्हणजेच कापूस पुरविण्याचेकाम कोरडवाहू शेती करत आहे. या बरोबरच महाराष्ट्रामध्ये खाद्यतेलाचे उत्पादन करणारे अनेक कारखाने स्थापन केले जात आहेत. त्यांना लागणारा कच्चामाल म्हणजेच गळीत धान्याचे उत्पादन कोरडवाहू शेती मध्ये होते. उदा. लातूर सारख्या शहरामध्ये दाळ प्रक्रिया उपयोग चालवीला जातो.

कोरडवाहू शेतीची उत्पादकता कमी असली तरी या शेतीतील उत्पादन शहरात पोहोचवीण्याचे काम वाहतूकीच्या माध्यमातून केले जाते. म्हणजेच वाहतूक व्यवस्थेच्या विकासात कोरडवाहू शेतीची भूमीका नाकारता येत नाही. या व्यवसायातून सुध्दा मोठया प्रमाणात रोजगार संधी निर्माण होते. कृषि बाजारपेठाचा विस्तार आणि विकास या मध्ये कोरडवाहू शेतीची भूमीका महत्वाची राहीली आहे. कोरडवाहू शेतीतील मालाला देशाच्या विविध प्रदेशात मागणी आहे. त्यामुळे देशातील बाजारपेठेच्या विस्तारात या शेतीची भूमिका महत्वपुर्ण राहीली आहे. देशातील अन्नधान्याच्या किंमती, कडधान्याच्या किंमतीमध्ये स्थिरता ठेवण्यासाठी कोरडवाहू शेती महत्वाची भूमिका पारपाडत आहे. या किंमती स्थिर असल्यामुळे देशातील सर्वसाधारण किंमत पातळी स्थिर ठेवता येऊ शकते.

कोरडवाहू शेतीच्या समस्या :-.

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत कोरडवाहू शेतीची भूमीका महत्वपुर्ण आहे. पण या शेतीपुढे अनेक समस्या आहेत. त्यामुळे या शेतीचा विकास होऊ शकला नाही. ज्या समस्या कोरडवाहू शेतीच्या आहेत. त्या पुढील प्रमाणे:-

१) अपुरी गुंतवणूक- या शेतीमध्ये पुरेशा प्रमाणात गुंतवणूक केली जात नसल्याने भांडवलाची समस्या निर्माण झाली आहे. शेती करणारा शेतकरी अल्प भूधारक असल्याने तो गरीब आहे. त्याकडे पुरेसे भांडवल नाही.

२) कर्ज बाजारीपणा- कोरडवाहू शेती करणारा शेतकरी सातत्याने कर्जबाजारी असतो. असे म्हणले जाते की, शेतकरी हा कर्जात जन्मतो आणि कर्जात मरतो. या शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा दिवसे दिवस वाढत चालला आहे.

३) पाण्याची कमतरता- या शेतीसाठी पुरेसेपाणी उपलब्ध होवू शकत नाही.त्यामळे शेतीच्या उत्पादनात आणि उत्पादकतेत वाढ घडवू आणण्यात मर्यादा येतात.

४) शेतकऱ्याचा दृष्टीकोन-कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्याचा दृष्टीकोन पारंपारीक स्वरुपाचा आहे. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढू शकत नाही.

५) शेतकऱ्याची निरक्षरता- कोरडवाहू शेती करणारा शेतकरी हा निरक्षर असून तो दैववादी आहे.

वरील प्रकारच्या अनेक समस्या कोरडवाहू शेती व्यवसायामध्ये असल्यामुळे या शेतीचा विकास होण्यास मर्यादा आहेत.

समस्या सोडविण्यासाठी उपायः-.

कोरडवाहू शेतीच्या समस्या सोडवीण्यासाठी पुढील काही उपाययोजना केल्या आहेत. तर या शेती व्यवसायाच्या विकासास मदत होईल. ते उपाय पुढील प्रमाणे

१) कोरडवाहू शेती विकास कार्यक्रमात प्रभावीपणे राबविणे या कार्यक्रमामध्ये सर्वच शे्तकऱ्याचा जास्तीजास्त सहभाग वाढवीण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

२) कोरडवाहू शेती संशोधन केंद्राच्यामाध्यमातून शेतकऱ्याचे प्रबोधन करणे. कमी पाण्यावर येणा-या वाणाची निर्मिती करुन त्यांचा जास्तीत जास्त वापर करण्यास भाग पाडणे. शेतकऱ्यासाठी शिबिरे आणि चर्चा सत्रे घडवून आणणे.

३) माती परिक्षणाचा कार्यक्रम प्रभावीपणे राबवून प्रत्येक शेतकऱ्याला त्याचा लाभ घेता आला पाहिजे अशी व्यवस्था करणे.

४) शेतकऱ्याला पाणी व्यवस्थापनाचे महत्व पटवून सांगणे.पडणा-या पावसाचे योग्य नियोजन करुन ते पाणी वाया जाणार नाही व त्याचा वापर शेतीसाठी केला पाहीजे.

५) कमी कालावधीत येणारी बीयाणे उपलब्ध करुन देणे व त्यांचा जास्तीत जास्त वापर शेतकऱ्याकडून केला जाईल यासाठी प्रयत्न करणे. वर्षातून एकापेक्षाजास्त पिके घेण्यासाठी आवश्यकते तंत्रज्ञान वापरण्यास भाग पाडणे.

६) पांरपारीक पध्दतीने शेती करण्यापेक्षा आधुनिक पध्दतीने शेती करणे.

७) कोरडवाहु शेती मध्ये गुंतवणुक वाढविण्यास प्रोत्साहन देणे व वेळेत पुरेश्याप्रमाणात कर्ज उपलब्ध करुन देणे.

८) कमी खर्चात किफायतशीर शेती कशी करता येईल यावर संशोधन करुन कोरडवाहू शेती विकासाला हातभार लावणे.

९) बीयाणे, किटकनाशके, खते यावर अनुदान देणे आवश्यक आहे.

१०) पिक विमा योजना प्रभावीपणे राबवून प्रत्येक शेतकऱ्याला या योजनेचा लाभ घेता आला पाहिजे अशी कार्यक्षम यंत्रणा निर्माण करणे.

११) कोरडवाहू शेतीतील पिकाना योग्य हमी भावाची गरज आहे. हमीभाव जर मिळाले तर शेतकऱ्याना शेतीकरण्यास प्रोत्साहन मिळेल.

१२) शेतमाल बाजारपेठेतील शेतकऱ्याची पिळवूणूक टाळण्यासाठी सरकारने कार्यक्षम यंत्रणा निर्माण केली पाहिजे. त्यामुळे व्यापारी ,दलाल, आडते यांच्यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.

१३) शेतक-याची प्रतिक्षा क्षमता कमी असल्याने त्याचे मोठे नुकसान होते हे टाळण्यासाठी शेतक-याच्या मालाची योग्य प्रकारे साठवणूक होईल अशी सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे जर उपाययोजना केल्या तर कोरडवाहू शेतीचा प्रश्न सोडविण्यास मदत होईल.

संदर्भः-.

१) भारतीय अर्थव्यवस्था- भोसले, दामजी, भानूमते, कदम

२) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था- साळुंखे आर.एम.

३) भारतातील आर्थिक विकास आणि नियोजन- डॉ. बी.जी.खटाळ

४)महाराष्ट्र- संतोष दस्ताने